प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

# सिडकोच्या १६,८७६ घरांच्या "माझे पसंतीचे सिडकोचे घर - माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये" योजनेत पर्याय निवडीसाठी १९ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ

सिडको महामंडळातर्फे राबविण्यात येत असलेल्या १६,८७६ सदनिकांच्या "माझे पसंतीचे सिडकोचे घर - माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये" गृहनिर्माण योजनेत पर्याय निवडीसाठी दि. १९ मार्च २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.योजनेस नागरिकांकडून मिळत असलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचा विचार करून तसेच अधिकाधिक सर्वसामान्य नागरिकांना हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.

"माझे पसंतीचे सिडकोचे घर – माझा फर्स्ट चॉइस नवी मुंबईमध्ये" या योजनेंतर्गत नवी मुंबईतील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली या नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) व अल्प उत्पन्न गट (LIG) यांच्यासाठी १६,८७६ सदनिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सान्निध्यात उभारण्यात येत असलेल्या या गृहसंकुलांना रेल्वे, महामार्ग आणि मेट्रोद्वारे उत्कृष्ट कनेक्टिव्हिटी लाभली असून नागरिकांना सोयीस्कर व सक्षम शहरी जीवनशैलीची संधी उपलब्ध होणार आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठीची व आपले पसंतीचे पर्याय निवडण्यासाठीची अंतिम तारीख १९ मार्च २०२६ आहे. सदर योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक नागरिकांनी अर्ज नोंदणीसाठी www.cidcohomes.com या अधिकृत संकेतस्थळास भेट द्यावी. योजनेसंदर्भातील सर्व अधिकृत व अद्ययावत माहिती सिडकोतर्फे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या पत्रकांद्वारे तसेच सिडकोच्या अधिकृत समाजमाध्यमांवरून वेळोवेळी प्रसारित केली जाते. त्यामुळे नागरिकांनी योजनेविषयी इतरत्र उपलब्ध होणाऱ्या अप्रमाणित माहिती किंवा अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात येत आहे.

अधिकाधिक नागरिकांनी दिलेल्या मुदतवाढीचा लाभ घेऊन योजनेसाठी अर्ज करावा आणि नवी मुंबईतील आपल्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार करावे, असे सिडकोतर्फे आवाहन करण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -